शैक्षणिक वर्ष २०२४-२५

हेरीटेज कल्चर आर्ट अँड एज्युकेशन डेव्हलपमेंट सोसायटी- रत्नागिरी, लांजा

# हेरीटेज प्रयोगवार्ता

**संस्थापक- संतोष कांबळे**
संपर्क: ९३७३३४६२१३

www.heritagekonkan.org.in

**अध्यक्ष- मा.अपर्णा पवार**
संपर्क: ७६६६०४७७३३



## 'हेरीटेज प्रयोगवार्ता'चा प्रकाशन सोहळा

गुरुवार दि.२६/१२/२०२४ रोजी वर्ष सरताना हेरीटेज कल्चर आर्ट अँड एज्युकेशन डेव्हलपमेंट सोसायटी, रत्नागिरी- लांजा संचलित,
प्राथमिक आश्रमशाळा जावडे ता.लांजा, जि.रत्नागिरी या निवासी शाळेच्या 'हेरीटेज वार्ता' या न्यूजलेटरचा प्रकाशन सोहळा महाराष्ट्र फाऊंडेशन, अमेरीकाचे माजी अध्यक्ष व पंचम प्रकल्प प्रमुख श्री.राजीव भालेराव, हेरीटेज संस्थेच्या अध्यक्षा तथा पं.स.लांजा माजी सभापती ॲड.अपर्णा पवार, संस्था प्रमुख संतोष कांबळे, पंचम प्रकल्प समन्वयक दत्ता गुरव यांच्या हस्ते पार पडला.

## शैक्षणिक सहल २०२४-२५

हेरीटेज कल्चर आर्ट अँड एज्युकेशन डेव्हलपमेंट सोसायटी, रत्नागिरी- लांजा संचलित,
प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा जावडे ता.लांजा, जि.रत्नागिरी या निवासी शाळेची शैक्षणिक सहल शनिवार दि.२८/१२/२०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती. सहलीमध्ये एकूण ९१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी सहलीचा मनमुराद आनंद लुटला.





## आंतरशालेय क्रीडा स्पर्धा

हेरिटेज कल्चर आर्ट अँड एज्युकेशन डेव्हलपमेंट सोसायटी संचलित न्यू इंग्लिश स्कूल जावडे तसेच प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा जावडे या तिनहीं शाळांचा हेरिटेज क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन हेरिटेज प्रयोगभूमी जावडे येथे आज शुक्रवार दिनांक १७ रोजी सकाळी १० वाजता करण्यात आले . यावेळी उद्धाघाटक म्हणून लांजा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नीलकंठ बगळे बोलत होते यावेळी व्यासपीठावर संस्थापक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष कांबळे, अध्यक्ष ॲड. अपर्णा पवार, माध्यमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक गजानन पांचाळ, जावडे हायस्कूलचे मुख्याध्यापक संदेश कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय दिव्यांग क्रीडा स्पर्धेत गौरव शिंदेचे नेत्रदीपक यश

रत्नागिरी येथे झालेल्या जिल्हास्तरीय दिव्यांग क्रीडा स्पर्धेत हेरिटेज कल्चर आर्ट अँड एज्युकेशन डेव्हलपमेंट सोसायटी संचलित न्यू इंग्लिश स्कुल जावडेचा इ.८ मधील विद्यार्थी कुमार गौरव शिंदे याने १०० मीटर धावणे या क्रीडा प्रकारात जिल्ह्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला असून त्याची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



गौरव शिंदे हा १०० मीटर धावणे या क्रीडा प्रकारात जिल्ह्यात प्रथम क्रमांक




## ५२ व्या लांजा तालुका विज्ञान प्रदर्शन विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेत प्रणव व पूजा यांचा द्वितीय क्रमांक

लांजा तालुका विज्ञान प्रदर्शन २०२५ मध्ये न्यू इंग्लिश स्कुल जावडे ने विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेत तालुकास्तरीय द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. विद्यालयाच्यावतीने

१)प्रणव लक्ष्मण कोलगे (८ वी)

२)पूजा महेश राणीम (९ वी)

या विद्यार्थ्यांना विज्ञान,गणित व सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्नांची अचूक उत्तरे देत हे यश मिळवले.



## न्यू इंग्लिश स्कुल जावडे या विद्यालयाचे लांजा तालुकास्तरीय गणित प्रश्नमंजुषा स्पर्धेत यश

हेरीटेज कल्चर आर्ट अँड एज्युकेशन डेव्हलपमेंट सोसायटी संचलित न्यू इंग्लिश स्कुल जावडे, ता. लांजा या माध्यमिक विद्यालयाचे लांजा तालुकास्तरीय गणित प्रश्नमंजुषा स्पर्धेत यश!

शनिवार दि. 11जानेवारी 2025 रोजी न्यू इंग्लिश स्कुल लांजा येथे लांजा तालुकास्तरीय गणित प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. लांजा तालुकास्तरीय गणित प्रश्नमंजुषा स्पर्धेत न्यू इंग्लिश स्कुल जावडे या प्रशालेने द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.



## महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन उत्साहात

हेरीटेज कल्चर आर्ट अँड एज्युकेशन डेव्हलपमेंट सोसायटी लांजा संचलित प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा जावडे येथे शुक्रवार दि.०६/१२/२०२४ रोजी महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन उत्साहात साजरा करण्यात आला.



## राष्ट्रीय गणित दिन

हेरीटेज कल्चर आर्ट अँड एज्युकेशन डेव्हलपमेंट सोसायटी लांजा संचलित माध्यमिक आश्रम शाळा जावडे लांजा येथे आज रविवार २२ डिसेंबर २०२४ रोजी श्रीनिवास रामानुजन यांचा जन्मदिवस गणित दिन म्हणून साजरा करण्यात आला.



## किशोरवयीन मुलींना मार्गदर्शन

हेरीटेज कल्चर आर्ट अँड एज्युकेशन डेव्हलपमेंट सोसायटी संचालित माध्यमिक आश्रमशाळा जावडे शाळेत दि.०३/१२/२०२४ रोजी किशोरवयीन मुलींना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी अंगणवाडी सेविका रसिका प्रसन्न दिक्षित (रावारी), ज्योती आनंदा नवाथे (जावडे) ब्राह्मणवाडी, उज्वला रविंद्र शिंदे (नामयेवाडी) यांनी किशोरवयीन मुलींना आरोग्य व स्वच्छता संदेश दिला.



## छत्रपती राजश्री शाहू महाराज जयंती

हेरीटेज प्रयोगभूमी येथे बुधवार दिनांक २६ जून २०२४ रोजी छत्रपती राजश्री शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली.







## गांडूळ खत निर्मिती प्रशिक्षण व कलम बांधणी

हेरीटेज कल्चर आर्ट अँड एज्युकेशन डेव्हलपमेंट सोसायटी संचलित माध्यमिक आश्रमशाळा जावडे, ता. लांजा येथे शनिवार दि.१३/०७/२०२४ रोजी गांडूळ खत निर्मिती व कलम बांधणी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.

न्यू इंग्लिश स्कूल जावडेच्या जेष्ठ शिक्षिका क्रांती करंबेळे यांनी विद्यार्थ्यांना गांडूळ खत निर्मिती व कलम बांधणीचे प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणावेळी आश्रमशाळेतील १२० विद्यार्थी उपस्थित होते विद्यार्थ्यांनी स्वतः गांडूळ खत निर्मिती प्रात्यक्षिकेही करून दाखविले. यावेळी माध्यमिक आश्रमशाळेचे मुख्याध्यापक गजानन नारायण पांचाळ तसेच सर्व शिक्षक उपस्थित होते.





## शिक्षण सप्ताह

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त सोमवार दि. २२ जुलै २०२४ ते रविवार दि. २८ जुलै २०२४ असा शिक्षण सप्ताह साजरा करण्यात आला.



शुक्रवार दि.२३/०८/२०२४ रोजी रत्नागिरी येथील नवनिर्माण महाविद्यालयात आयोजित कै. मृणाल हेगशेट्ये स्मृती जिल्हास्तरीय (माध्यमिक गट) वक्तृत्व स्पर्धेत माध्यमिक आश्रमशाळा जावडेतील इ. ९ वी तील कु. अक्षता दर्शना दत्ताराम जांगळे हिने सहभाग नोंदवला.







हेरीटेज कल्चर आर्ट अँड एज्युकेशन डेव्हलपमेंट सोसायटी लांजा संचलित माध्यमिक आश्रमशाळा, जावडे (निवासी शाळा) येथील विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय विज्ञान नाट्य स्पर्धेमध्ये सहभाग घेतला व तालुकास्तरीय तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.

हेरीटेज कल्चर आर्ट अँड एज्युकेशन डेव्हलपमेंट सोसायटी लांजा संचलित माध्यमिक आश्रमशाळा, जावडे (निवासी शाळा) येथे डॉ.पेडणेकर यांनी चांगल्या आरोग्याच्या सवयीविषयी व राष्ट्रीय कृष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमा निमित्ताने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.





# हेरीटेज महोत्सव २०२४-२५

## आंतरशालेय क्रीडा स्पर्धा













# हेरीटेज महोत्सव २०२४-२५

## वार्षिक स्नेह-संम्मेलन

















# हेरीटेज महोत्सव २०२४-२५

## वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ






















## मा.राजीव भालेराव (माजी अध्यक्ष, महाराष्ट्र फाउंडेशन अमेरिका व पंचम प्रकल्प प्रमुख) व श्री.दत्ता गुरव (समन्वयक, पंचम प्रकल्प, महाराष्ट्र फाउंडेशन) यांची हेरीटेज प्रयोगभूमीस भेट












## खालील मान्यवरांनी हेरीटेज प्रयोगभूमीस भेट दिली...



रत्नागिरी जिल्हा परिषदेचे उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) मा. श्री. नरेंद्र गावंड साहेब यांनी हेरीटेज प्रयोगभूमीस भेट दिली.

लांजा तालुक्यातील दिवाणी न्यायालयाचे न्यायाधीश भोसले साहेब (श्रेणी १) व समाजकल्याण रत्नागिरी कार्यालयाचे अधिकारी खेडेकर साहेब यांनी हेरीटेज प्रयोगभूमीस भेट दिली. त्यावेळी खेडेकर साहेबांनी शाळेस संविधानाची प्रत भेट दिली.






विविध विषयातील तज्ञ मंडळी येऊन हेरीटेज प्रयोगभूमीतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असतात. न्यू इंग्लिश स्कुल लांजा या माध्यमिक विद्यालयाचे गणित विषयाचे जेष्ठ व अनुभवी शिक्षक मा. श्री. जांभळे सर इ.१० वी च्या विद्यार्थ्यांना गणित विषयाचे तज्ञ मार्गदर्शक म्हणून लाभले.

प्राथमिक आरोग्य केंद्र जावडे च्या वैद्यकीय अधिकारी डॉक्टर श्रोते यांची भेट व विद्यार्थिनींना मार्गदर्शन



# अशी घेतली वर्तमानपत्रांनी दखल

## साहित्यिकांची पुस्तके वाचल्यास प्रगल्भता वाढेल

### अरुण मौर्य : कोमसापतर्फे लांजातील जावडे येथे काव्यवाचन स्पर्धा

**लांजा : पुढारी वृत्तसेवा**

शालेय जीवनापासूनच लेखन आणि अभिव्यक्ती गुण विध्यार्थ्यांमध्ये रुजायला हवे. शालेय पुस्तकांप्रमाणे मराठीतील नामवंत लेखक, कवी, साहित्यिकांची पुस्तके वाचावीत जेणेकरून विद्यार्थ्यांच्या विचारांची प्रगल्भता वाढेल आणि सामाजिक जीवन जगताना नवोदित लेखक कवीही निर्माण होतील, असे प्रतिपादन कोकण मराठी साहित्य परिषदेचे युवाशक्ती जिल्हाध्यक्ष अरुण मौर्ये यांनी लांजा तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल व आश्रम शाळा जावडे येथे केले.



**लांजा : विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरवताना कोमसाप युवाशक्ती जिल्हा अध्यक्ष अरुण मौर्ये, प्रवीण कांबळे, संदेश कांबळे, गजानन पांचाळ.**

मराठी भाषा पंधरवडानिमित्त कोमसाप युवाशक्ती रत्नागिरी जिल्हा व न्यू इंग्लिश स्कूल व आश्रम शाळा जावडे यांच्या संयुक्त विद्यमाने जावडे येथे काव्यवाचन व कवितेवर बोलू काही कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. न्यू इंग्लिश स्कूल जावडे व आश्रम शाळा जावडेचे संस्थापक तथा मुख्यकार्यकारी अधिकारी संतोष कांबळे व अध्यक्षा ॲड. अपर्णा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या या कार्यक्रमाप्रसंगी मुख्याध्यापक संदेश कांबळे, मुख्याध्यापक गजानन पांचाळ, कोमसाप लांजा शाखा युवाशक्ती प्रमुख प्रवीण कांबळे उपस्थित होते.

काव्यवाचन स्पर्धेची सुरुवात दीप्रज्वलन करून झाली. त्यानंतर शाळेतील १८ विद्यार्थ्यांनी स्वरचित कवितांचे वाचन केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक संदेश कांबळे यांनी विध्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. काव्यवाचन केलेल्या सर्व स्पर्धक विध्यार्थ्यांना कोमसापकडून प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

Ratnagiri Edition
Feb 08, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

## ग्रामीण भागातील मुलांमध्ये गुणवत्ता

### पोलिस निरीक्षक नीळकंठ बगळे; सातत्य राखल्यास यश दूर नाही

**लांजा: पुढारी वृत्तसेवा**

खेळ म्हटला की हार-जित होत असते. मात्र, अपयशाने खचून न जाता, आपले कुठे आणि काय चुकले, याचे आत्मचिंतन करून नव्या उमेदीने पुन्हा सहभागी झाल्यास यश दूर नाही. ग्रामीण भागात दर्जेदार खेळाडू असून त्यांच्यामध्ये गुणवत्ता आहे. मात्र, त्यांना योग्य मार्गदर्शन भेटले तर जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर आपल्या तालुक्याचे आणि जिल्ह्याचे नाव रोशन करतील, असा विश्वास लांजा पोलिस ठाण्याचे निरीक्षक नीळकंठ बगळे यांनी व्यक्त केला. लांजा तालुक्यातील जावडे येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

हेरिटेज कल्चर आर्ट अँड एज्युकेशन डेव्हलपमेंट सोसायटी संचलित न्यू इंग्लिश स्कूल जावडे तसेच प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा जावडे या तिनही शाळांच्या हेरिटेज क्रीडा महोत्सवाचे शुक्रवार, १७ जानेवारी रोजी आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी लांजा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नीळकंठ बगळे



**लांजा: क्रीडाज्योत प्रज्वलित करताना लांजा पोलिस निरीक्षक नीळकंठ बगळे. यावेळी ॲड. अपर्णा पवार, संतोष कांबळे, संदेश कांबळे, गजानन पांचाळ.**

प्रमुख उद्‌घाटक म्हणून उपस्थित होते. व्यासपीठावर संस्थापक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष कांबळे, अध्यक्ष ॲड. अपर्णा पवार, माध्यमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक गजानन पांचाळ, जावडे हायस्कूलचे मुख्याध्यापक संदेश कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी क्रीडा शिक्षक अमोल पवार व विदेश फणसे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी मान्यवरांना मानवंदना दिली व क्रीडाज्योत प्रज्वलित करण्यात आली. त्या नंतर खो-खो, कबड्डी, व्हॉलीबॉल असे सांघिक तर लांब उडी, उंच उडी, गोळा फेक, थाळीफेक आदी वैयक्तिक क्रीडा प्रकार देखील घेण्यात आले. यावेळी तीन्ही शाळांमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

Ratnagiri Edition
Jan 19, 2025 Page No. 02



लांजा तालुक्यातील जावडे आश्रमशाळेत ॲड. स्मिता मांडवकर यांनी कायद्याची माहिती दिली.

## जावडे आश्रमशाळेत कायद्याची माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

लांजा : लांजा तालुका विधिसेवा प्राधिकरण समितीतर्फे लांजा येथील न्यू इंग्लिश स्कूल, जावडे तसेच प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा जावडे येथे कायदेविषयक मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात आली.

तालुका विधिसेवा प्राधिकरण समितीतर्फे तालुक्यातील ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. स्मिता मांडवकर, हेरिटेज संस्थेच्या अध्यक्षा ॲड. अपर्णा पवार, तालुका विधी समितीच्या सदस्या स्वप्नजा सावंत, शरद चव्हाण, लांजा न्यायालयाच्या वाडेकर, हेरिटेज संस्थेचे संस्थापक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष कांबळे, आश्रमशाळेचे मुख्याध्यापक गजानन पांचाळ, जावडे हायस्कूलचे मुख्याध्यापक संदेश कांबळे उपस्थित होते.

ॲड. स्मिता मांडवकर यांनी कायदा साक्षरता याविषयी माहिती देताना संविधान आणि त्याची प्रास्ताविका, स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्ये, तसेच बालकाचा शिक्षणाचा हक्क, बालकामगार बंदी, बालकाचे लैंगिक शोषण, बाल अत्याचार याविषयी माहिती दिली. ॲड. अपर्णा पवार यांनी बालविवाह प्रतिबंध कायदा, तसेच बालकांचे होणारे शोषण, त्यांचे हक्क आणि अधिकार याविषयी अगदी सोप्या शब्दांत मुलांना माहिती दिली. तसेच बालकांवर होणारे अन्याय व अत्याचार याची माहिती कुणाला द्यावी, याविषयी देखील माहिती दिली. विविध कायद्यांविषयी जाणीवजागृती होऊन सजग झाले पाहिजे, असे विचारही त्यांनी यावेळी व्यक्त केले.

यावेळी संस्थापक संतोष कांबळे यांनी संस्थेतर्फे बालकांच्या हक्कासाठी व संरक्षणासाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम यांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षिका कविता गावडे यांनी केले.

पाटील व प्रवीण बादकर यांचे शाल, बादकर यांच्या हस्ते करण्यात आला.

## लांजात 'हेरिटेज प्रयोगवार्ता' या न्यूजलेटरचा प्रकाशन सोहळा



**लांजा, (वा.)** हेरीटेज कल्चर आर्ट अँड एज्युकेशन डेव्हलपमेंट सोसायटी, रत्नागिरी- लांजा संचलित, प्राथमिक आश्रमशाळा जावडे या निवासी शाळेच्या 'हेरीटेज वार्ता' या न्यूजलेटरचा प्रकाशन सोहळा गुरुवारी उत्साहात पार पडला. यावेळी महाराष्ट्र फाऊंडेशन- अमेरीकाचे माजी अध्यक्ष व पंचम प्रकल्प प्रमुख राजीव भालेराव यांच्या हस्ते त्याचे प्रकाशन करण्यात आले यावेळी हेरीटेज संस्थेच्या अध्यक्षा तथा पं.स.लांजा माजी सभापती अँड. अपर्णा पवार, संस्था प्रमुख संतोष कांबळे, पंचम प्रकल्प समन्वयक दत्ता गुरव आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी न्यू इंग्लिश स्कूल जावडेचे मुख्याध्यापक संदेश कांबळे व प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा जावडेचे मुख्याध्यापक गजानन पांचाळ तसेच संस्थेचे सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

लांजा - जावडे येथील शाळेत वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

## योग्यवेळी योग्य शिक्षण दिले तर आदर्श समाज घडतो : माने

लोकमत न्यूज नेटवर्क

लांजा : गोरगरीब विद्यार्थ्यांना आश्रम शाळेच्या माध्यमातून दर्जेदार शिक्षण देण्याचे काम हेरिटेज संस्था करत आहे. त्यामुळेच या शाळेत मोठ्या प्रमाणात विद्यार्थी प्रवेश घेत आहेत. योग्य वेळी योग्य शिक्षण दिले तरच आदर्श समाज घडतो आणि हे योग्य शिक्षण देतानाच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल यासाठी संस्थेने केलेले प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन माजी आमदार बाळ माने यांनी केले.



लांजा तालुक्यातील जावडे येथील न्यू इंग्लिश स्कूलमधील पारितोषिक वितरण समारंभात माजी आमदार बाळ माने यांचा अपर्णा पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी संतोष कांबळे, उल्का विश्वासराव व इतर उपस्थित होते.

जावडे (ता. लांजा) येथील न्यू इंग्लिश स्कूल तसेच प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा या तीनही शाळांचा वार्षिक पारितोषिक वितरण व संगणक कक्षाचे उदघाटन माजी आमदार बाळ माने यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर उल्का विश्वासराव, संस्थेच्या अध्यक्षा ॲड. अपर्णा पवार, संस्थापक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष कांबळे, खजिनदार संदीप तावडे, सामाजिक कार्यकर्ते विजय कुरूप, चंद्रकांत मांडवकर, बाबा दळी, माध्यमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक गजानन पांचाळ, प्राथमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक शिवप्रसाद ताटके, जावडे हायस्कूलचे मुख्याध्यापक संदेश कांबळे उपस्थित होते.

यावेळी तिन्ही शाळांतील सुमारे ३५० विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. यावेळी संस्थेतर्फे उभारण्यात आलेल्या अद्ययावत संगणक कक्षाचे उद्घाटन करण्यात आले. बाळ माने यांनी पुढे सांगितले की, स्पर्धेच्या युगात मुलांच्या शारीरिक वाढीबरोबर त्यांना वाचन, लिखाण आणि पाठांतर आलेच पाहिजे. विद्यार्थ्यांना सर्व सोयीसुविधा देण्यासाठी संस्था म्हणून संतोष कांबळे आणि अपर्णा पवार सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून करीत असलेले काम प्रेरणादायी असून, भविष्यात ही मुले आत्मनिर्भर होऊन समाजाची नक्कीच काळजी घेतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यावेळी उल्का विश्वासराव, संस्थापक संतोष कांबळे, अध्यक्षा अपर्णा पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



Future view..







# गरज आपल्या मदतीची...

हेरीटेज कल्चर आर्ट अँड एज्युकेशन डेव्हलपमेंट सोसायटी, रत्नागिरी- लांजा संचलित, न्यू इंग्लिश स्कूल जावडे, प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा जावडे, ता.लांजा, जि.रत्नागिरी या निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी आपणही आम्हाला वस्तू किंवा आर्थिक स्वरुपात मदत करू शकता. आपण केलेली मदत समाजातील गरीब व कष्टकरी कुटुंबातील मुला-मुलींच्या शिक्षणासाठीच वापरली जाईल, याची आम्ही खात्री देतो. आपण आम्हाला पुढीलपैकी तुम्हाला शक्य असेल अशी वस्तू किंवा त्यासाठी लागणारी आर्थिक मदत करू शकता.

- विविध विषयावर आपले मार्गदर्शन
- आमच्यासाठी स्वयंसेवक म्हणून काम
- ग्रंथालयासाठी पुस्तके
- पाण्याची बॉटल
- विद्यार्थ्यांसाठी शूज
- विद्यार्थ्यांसाठी खेळणी

विद्यार्थ्यांना शालेय स्टेशनरी

- वह्या
- चित्रकला वही
- पेन
- पेन्सिल
- खोडरबर
- चित्रकलेसाठी कलर
- पट्टी
- अंकलिपी

- स्मार्ट इंटरॅक्टिव्ह बोर्ड
- संगणक, प्रिंटर
- स्पिकर सेट
- नोटीस बोर्ड
- ग्रीन बोर्ड
- शालेय दप्तर
- वॉटर फिल्टर
- इमारत रंगकाम
- स्लायडिंग विंडो




## - मदतीसाठी संपर्क -

**संतोष कांबळे (संस्थाप्रमुख)**
संपर्क: ९३७३३४६२१३

**गजानन पांचाळ**
**मुख्याध्यापक**
**प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा जावडे**
संपर्क: ८१४९८१२१३२

**संदेश कांबळे**
**मुख्याध्यापक**
**न्यू इंग्लिश स्कूल जावडे**
संपर्क: ९२७०५३४३४०

All donations to HERITAGE CULTURE ART AND EDUCATION DEVELOPMENT SOCIETY are eligible for tax exemption under Section 80G & 35 AC of Income Tax Act,1961.